**ग्रामीण कृषी मौसम सेवा**

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 26-07-2022**

**वॉशिम(महाराष्ट्र) मध्ये वाशिम ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2022-07-26 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2022-07-27 | 2022-07-28 | 2022-07-29 | 2022-07-30 | 2022-07-31 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 14.3 | 0.7 | 0.0 | 0.0 | 4.9 |
| कमाल तापमान (अं.से) | 28.7 | 29.0 | 31.6 | 32.0 | 31.4 |
| किमान तापमान (अं.से) | 23.1 | 23.6 | 24.8 | 25.1 | 24.8 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 92 | 90 | 86 | 80 | 81 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 71 | 71 | 58 | 52 | 57 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 14.0 | 11.0 | 12.0 | 14.0 | 14.0 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 302 | 294 | 315 | 297 | 302 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 8 | 8 | 6 | 8 | 8 |

## हवामान सारांश / चेतावणी:

प्रादेशिक हवामान केंद्र नागपूर यांचे कडून प्राप्त मध्यम कालावधी हवामान अंदाजानुसार वाशीम जिल्ह्यातील वाशीम तालुक्यात पुढील ५ दिवस २६ ते ३० जुलै २०२२ दरम्यान आकाश ढगाळ राहून सर्वत्र ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## कृषि सल्ला:

तालुक्यात गेल्या आठवड्यात सार्वत्रिक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस झाल्याने शेतातील खरीप पिके, भाजीपाला पिके व फळबागांमध्ये कीड-रोगाचा व तणांचा प्रादुर्भाव बऱ्याच ठिकाणी दिसून येत आहे. म्हणून व्यवस्थापनासाठी शेतकरी बांधवांनी कीटकनाशके, कीडनाशके व तणनाशके फवारताना लेबल क्लेम शिफारसीनुसार सुरक्षितता बाळगून फवारावीत. तसेच फवारणी कोरडे हवामान पाहून पाऊस नसताना करावी.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

तणनाशक फवारणी करतांना गढूळ, डबक्यातील पाणी वापरू नये स्वच्छ पाणी वापरावे तसेच फवारणी यंत्राची टाकी स्वच्छ धुतल्याशिवाय तणनाशक फवारणी करीता वापरू नये.शिफारस नसलेल्या रासायनिक मिश्रणाचा वापर टाळावा.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| सोयाबीन | शेतकरी बंधूनी आपल्याकडील स्थानिक वातावरणाचा/ पावसाचा अंदाजानुसार पिकावर तणनाशकाची फवारणी करावी. सोयाबीन पिकातील प्रभावी तण व्यवस्थापनासाठी, उगवण नंतर तणांच्या प्रभावी नियंत्रणासाठी इमॅझीथायपर १० % एस.एल. या तणनाशकाची १५ ते २०मिली मात्रा प्रती १० ली. पाण्यात मिसळून पिक पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी फवारणी पाऊस नसताना करावी. सोयाबीन पिकावर स्पोडोप्टेरा किंवा पाने पोखरणाऱ्या अळ्यांच्या प्रादुर्भाव आढळल्यास त्यांच्या निरीक्षणासाठी हेक्टरी ८ कामगांध सापळे लावावेत. |
| कपाशी | कपाशीमध्ये मर आणी मुळकुज रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास प्रादुर्भावग्रस्त शेतामध्ये व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझिम ५० % डब्ल्यूपी यू . २० ग्राम प्रती १० लिटर पाणी किंवा ट्रायकोडर्मा हर्झियानम किंवा ट्रायकोडर्मा व्हिरिडी १० ग्रॅम प्रती १ लिटर पाण्यात मिसळून पिकाला आळवणी करावी. ट्रायकोडर्मा हर्झियानम किंवा ट्रायकोडर्मा व्हिरिडी पावडर १ किलो २५ किलो चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट मध्ये मिसळून कपाशीच्या ओळीमध्ये जमिनीमध्ये फेकून मिसळावे. |
| कपाशी | कापूस पिकाची लागवड करून १ महिन्याचा कालावधी झाला असल्यास नत्राचा दुसरा हप्ता बागायतीसाठी ६० किलो नत्र प्रति हेक्टरी व कोरडवाहूसाठी ३६ किलो नत्र प्रती हेक्टर जमिनीत वापसा असतांना रिंगण पद्धतीने द्यावा. कापूस पिकात जमिनीत वापसा असतांना आंतरमशागतीची कामे करून पीक तन विरहीत ठेवावे. |
| तूर | तूर पिकामध्ये आंतरमशागत ( पहिली निंदणी) करावी व पीक तणविरहीत ठेवावे. तूर पिकामध्ये निरीक्षण करावे त्याच बरोबर मर रोगाची लक्षणे दिसून आल्यास प्रादुर्भावग्रस्त झाडे उपटून शेताबाहेर नष्ट करावीत. तूर पिकामध्ये मर आणी मुळकुज रोगाचा प्रादुर्भाव आढळूनआल्यास प्रादुर्भावग्रस्त शेतामध्ये व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझिम ५० % डब्ल्यूपी २० ग्राम प्रती १० लिटर पाणी किंवा ट्रायकोडर्मा हर्झीयानम किंवा ट्रायकोडर्मा व्हिरिडी १० ग्रॅम प्रती १ लिटर पाण्यात मिसळून पिकाला आळवणी करावे. |
| मका | मका पिकामध्ये आंतरमशागत (पहिली निदणी) करावी व पीक तणविरहित ठेवावे. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| संत्रा | • झाडांच्या बुंध्याजवळ पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. आवश्यकता भासल्यास आधीखोदलेल्या चरांद्वारे अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. • जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असल्याची खात्रीआणि वाफसा आल्यानंतर भरून ठेवलेल्या खड्ड्यांमध्ये संत्र वर्गीय फळझाडांच्या कलमांची लागवडकरावी. कलमा लावतांना कलमांचा डोळा १५ ते २० सेंमी उंचीवर असावा. कलमा लावण्यापूर्वी मुळांना मेफेनोक्झाम एम झेड-६८ २.५ ग्राम आणि कार्बेन्डाझीम ५० % डब्ल्यूपी १ ग्राम प्रती १ लिटर पाणी याप्रमाण द्रावण तयार करून बुडवून नंतर लावावीत. • झाडांच्या बुंध्याजवळ पाणी साचून राहणार नाहीयाची काळजी घ्यावी. झाडावरील पानसोट काढून टाकावेत. |
| हळद | हळद पिक पिवळे पडत असल्यास व्यवस्थापनासाठी शेतात वाफसा स्थिती राहील अशी व्यवस्था करावी व नंतर ०.५ ते १ टक्का फेरस सल्फेटची किंवा ईडीटीए चिलीटेड मिक्स मायक्रोन्यूट्रनट ग्रेड (II) ५०० ग्रॅम प्रती १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | शेतकऱ्यांनी जनावरांना तोंडखुरी-पायखुरी, घटसर्प आणि एकटांग्या या रोगाची लागण होऊ नये म्हणून पशुवैद्यकाच्या सल्ल्याने लसीकरण करावे. तसेच पावसाचे पाणी जनावरांच्या गोठ्यात साचणार नाही याची काळजी घ्यावी. |

## कुकुटपालन विषयक निहाय सल्ला:

| कुकुटपालन विषयक | कुकुटपालन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| पक्षी | पावसाच्या पाण्यामुळे आणी हवेतील जास्त आद्रेतेमुळे बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भावापासून संरक्षणासाठी पाणी शेडमध्ये येऊ नये यासाठी प्लॅस्टीकचे पडदे वापरावेत. हवा खेळती राहण्यासाठी पाऊस नसताना पडदे उघडे ठेवावेत. पक्षाना स्वच्छ पाणी प्यावयास द्यावे. |